


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र । शुक्रवार दि. ०८ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४९ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रूपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com










# बीड भूसंपादन घोटाळ्याप्रकरणी अविनाश पाठक यांना अटक

## 73 कोटींच्या गैरव्यवहाराचा आरोप




**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपाशी संबंधित कथित आर्थिक घोटाळ्याप्रकरणी मोठी कारवाई करण्यात आली आहे. बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना विशेष तपास पथकाने (SIT) लातूर येथून अटक केली आहे. दिवसभर चौकशी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली असून त्यांना पुढील सुनावणीसाठी बीड न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या प्रकरणात राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांना वाढीव मावेजा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या आदेशांवर खोट्या सह्या आणि मागील तारखा वापरून कोट्यवधी रुपयांचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## दहावीचा निकाल आज दुपारी एक वाजता




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल शुक्रवार दि. ८ मे रोजी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी दिली आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेचा निकाल पुढील अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येईल.

1) https://results.digilocker.gov.in 2) https://mahahsscboard.in 3) https://sscresult.mkcl.org 4) https://results.targetpublications.org 5) https://results.navneet.com 6) https://www.tv9marathi.com ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड, सोलापूरसह अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाचा इशारा, हवामान विभागाचा यलो अलर्ट




**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (खचऊ) राज्यातील अनेक भागांसाठी पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह वादळी पावसाचा इशारा दिला आहे. कोकण–गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या कोकण पट्ट्यात उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले ▶▶ उर्वरित पान २ वर

## अनिशा ग्लोबल स्कूलच्या प्रगती जगदाळेची महाराष्ट्र राज्य सेपाक टकरा स्पर्धेत चमकदार कामगिरी




**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरातील अनिशा ग्लोबल स्कूल येथील १४ वर्षाखालील गटातील खेळाडू कु. प्रगती गौतम जगदाळे हिने महाराष्ट्र राज्य सेपाक टकरा संघाकडून खेळताना उल्लेखनीय कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला आहे. तेलंगणा येथे दि. २४ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या स्पर्धेत प्रगतीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. पहिल्या सामन्यात उत्तर प्रदेश संघाचा, दुसऱ्या सामन्यात गुजरात संघाचा तर तिसऱ्या सामन्यात पुन्हा उत्तर प्रदेश संघाचा पराभव करत तिने विजयाची सलामी कायम ठेवली. तिच्या दमदार खेळीमुळे महाराष्ट्र संघाला महत्त्वपूर्ण यश मिळाले. प्रगतीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

# धांडे नगर कमानी नजिक पाईपलाईन लिकेजमुळे लाखो लिटर पाणी वाया

## बीड पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या डोळ्याला लासूर झाले का ?

● रात्रंदिवस पाण्याची गळती मात्र प्रशासनाला नाही सोयरसुतक, नागरिकांची संतप्त भावना



**बीड । प्रतिनिधी**

बार्शी रोडच्या सिमेंट रस्त्याचे काम सुरु असून तत्पूर्वी रस्त्याच्या बाजूच्या मोठ्या नाल्याचे काम करण्यात येत आहे. त्यातच येथील धांडे नगर कमानी नजिक शहरातील काही भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाईपालईन गेल्या काही दिवसांपासून लिकेज होत असून यामुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी होवून वाया जात आहे. रात्रंदिवस पाण्याची गळती होत असतांना पालिका प्रशासनाला याचे मात्र काही सोयर– ▶▶ उर्वरित पान २ वर

## थकीत ऊस देयकासाठी शेतकरी आक्रमक ; ओंकार शुगर्सला टाळे ठोकण्याचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील पांगरी येथील ओंकार शुगर्स कारखान्याने जानेवारी ते मार्च दरम्यानच्या गाळपाचे पैसे अद्याप न दिल्याने संतप्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्यावर धडक देत तीव्र निदर्शने केली. ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकऱ्यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबासाठी साई संस्थानकडून मोफत शिक्षणाची घोषणा

### १० वीमध्ये ८०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ११वी–१२वीचे मोफत शिक्षण, निवास आणि CET फी ची सुविधा मिळणार

**शिर्डी । प्रतिनिधी**

साईबाबा संस्थान यांनी शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. राज्यात वाढत असलेल्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून, मुलांचे शिक्षण अर्धवट राहण्याची समस्या गंभीर बनली आहे. हीच बाब लक्षात घेऊन संस्थानने पुढाकार घेत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी उचलण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष योजनेअंतर्गत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत निवास, शिक्षण आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, दहावी परीक्षेत ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ११ वी आणि १२ वीचे संपूर्ण शिक्षण मोफत दिले जाणार आहे. इतकेच नव्हे, तर अभियांत्रिकी आणि वैद्यकीय ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा रुग्णालयातील दप्तरातून पोलिसांनी आतापर्यंत काय शोधले ?

### गुन्हे दाखल होऊनही कारवाई नाही : अनेक अधिकारी, डॉक्टरांची मुलेही दिव्यांगांच्या यादीत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयातून अनेकांनी बोगस दिव्यांग व वैद्यकीय प्रमाणपत्र काढली आहेत. पोलिसांनी रुग्णालयातील दप्तरही ताब्यात घेतले आहे. मात्र, अगोदर तोफखाना पोलिस व नंतर आर्थिक गुन्हे शाखेने या दप्तराचा अभ्यास



करुन काय कारवाई केली? हे काहीही समोर आलेले नाही. पोलिस अधिकाऱ्यांनीही यात 'अर्थ'पूर्ण चुप्पी साधल्याची चर्चा आहे. जिल्हा रुग्णालयातून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढल्याप्रकरणी तोफखाना, राहुरी, शेवगाव व पारनेर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल आहेत. मात्र, या एकाही गुन्ह्याच्या तपासात पोलिस प्रकरणांच्या मुळाशी गेलेले नाहीत. जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रेमळ, जिवाभावाचा आणि सर्वांना जोडून ठेवणारा मित्र गमावला : आ.सुरेश धस

**बीड । प्रतिनिधी**

हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झालेल्या सतीश उर्फ बंडू धोंडे यांच्या अकाली जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत असून,त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करताना आ. सुरेश धस यांनी सध्याच्या बदलत्या जीवनशैलीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. ▶▶ उर्वरित पान २ वर




## दुपारी घरी एकट्या महिलेला गाठलं अन् केली 'ही' मागणी




**बीड । प्रतिनिधी**

महिलांवरील अत्याचाराचे प्रकार वारंवार वाढतच आहेत. आता आष्टी तालुक्यातून धक्कादायक प्रकार पुढं आला आहे. 'तू माझ्यासोबत शरीरसंबंध ठेव, नाहीतर तुला विषारीद्रव्य पाजून संपवेल,' अशी धमकी देत एका ४८ वर्षीय महिलेचा विनयभंग केला. याप्रकरणी आंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.आष्टी तालुक्यातील एका गावात दुपारच्या सुमारास महिला घरात एकटी होती. तेव्हा दोन आरोपी तिथे आले आणि महिलेसोबत पतीशी मैत्री असल्याचे सांगून बोलू लागले. तेव्हा त्यांनी महिलेचा मोबाईल मागितला. मात्र, तिने मोबाईल देण्यास विरोध दर्शवला. तेव्हा आरोपींनी तिच्याशी झटापट करून गैरकृत्य केलं. तू माझ्यासोबत शरीरसंबंध ठेव, नाहीतर तुला विषारी द्रव्य पाजेल अशी धमकी देत महिलेचा विनयभंग केला. तसंच तिला शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून महादेव किसन शिंदे आणि तानाजी अशोक थोरात (दोघे रा. सराटेवडगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अंभोरा पोलिसांनी दोघा आरोपींना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

# रिल्सची आभासी दुनिया !

सध्याचे युग हे स्मार्ट फोन आणि इंटरनेटचे युग आहे. हातात स्मार्ट फोन नाही असा तरुण आज शोधूनही सापडणार नाही. इंटरनेटचा डाटा पॅकही परवडणारा असल्याने प्रतिदिन २ जीबी मिळणारा डाटा आजचा तरुण कामासाठी कमी आणि मनोरंजनासाठीच अधिक व्यय करताना दिसतो. ऑनलाईन गेम्स खेळण्यासोबतच आजच्या पिढीला वेड लागले आहे ते रिल्स पाहण्याचे. आजमितीला इंस्टाग्राम आणि युट्युबवर विविध विषयावरील कोट्यवधी रिल्सचे भांडार उपलब्ध आहे. विविध शासकीय योजनांची माहिती देणारे, तांत्रिक युक्त्या शिकवणारे, नवनवीन पदार्थांच्या रेसिपी सांगणारे, फिल्मी जगताची माहिती देणारे,क्रीडा क्षेत्रातील निवडक आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग दाखवणारे, प्रतिष्ठित व्यक्तींच्या खासगी आयुष्यातील घडामोडींची माहिती देणारे, नृत्याचे प्रशिक्षण देणारे, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावरील घडामोडी टिपणारे, मधुचंद्राला कुठे जावे इथपासून तर कुटुंबासह सुट्टी साजरी करण्यास जाण्यासाठी विविध पर्यटन स्थळांची आणि धार्मिक स्थळांची माहिती देणारे, लाखो रिल्स आज सहज उपलब्ध आहेत. यासोबतच चित्रपटातील एखाद्या गाण्यातील हुक स्टेपवर थिरकणारे तरुण तरुणींचे रिल्स, मालिका आणि चित्रपटांतील विनोदी प्रसंगांचे रिल्सही पुष्कळ प्रमाणात उपलब्ध आहेत. खास प्रौढांसाठी तयार करण्यात आलेले रिल्सही आज वयाची कोणतीच अट न बाळगता सहजपणे सर्वांना पाहता येतात. अशा रिल्समध्ये शिव्यांचा आणि अश्लील शब्दांचा मुक्तपणे वापर तर असतोच शिवाय अशा रिल्स बनवणाऱ्या तरुणी अंगप्रदर्शन करून रिल्सवर प्रतिदिन लाखो लाईक्स कमावत असतात. मनोरंजनासाठी तयार करण्यात आलेल्या, विनोदी मसाला असलेल्या, द्विअर्थी संवादांचा भरणा असलेल्या आणि अश्लील कंटेंट असलेल्या रिल्स पाहण्यात आजचा तरुण अधिक रुची दाखवत असल्याने अशा प्रकारच्या रिल्स बनवणाऱ्या युट्युबर्सची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ठराविक सबस्क्राइबर झाल्यावर, रिल्सना ठराविक लाईक्स आणि शेअर्स मिळाल्यावर ते बनवणाऱ्यांना आर्थिक कमाईसुद्धा होत असल्याने रिल्स बनवणाऱ्यांची संख्या आज वारेमाप वाढली आहे. काहींना तर रिल्स बनवण्याचे जणू व्यसनच लागले आहे. शहरासारख्या ठिकाणी रेल्वे स्थानक असो वा बस स्टॅन्ड, भाजी मंडई असो वा शॉपिंग मॉल सर्वत्रच तरुण मुलामुलींची टोळी रिल्स बनवताना कोणत्या ना कोणत्या कोपऱ्यात दिसून येते.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी, विवाहित तरुणी विविध गाण्यांवर अंगविक्षेप करत रिल्स बनवतात आणि त्या इंस्टाग्राम आणि युट्युबवर अपलोड करतात. अशा रिल्सवर येणाऱ्या आंबट शौकिनांच्या कमेंट्स वाचून या तरुणींच्या आई वडिलांना, जवळच्या जिवाभावाच्या नातेवाईकांना काय वाटत असेल, याचा विचार या तरुणी करणार आहेत का ? रिल्स बनवण्याच्या आहारी गेलेला मोठा वर्ग आज समाजात पाहायला मिळतो आहे. अशा तरुण-तरुणींना रिल्स बनवताना आपण कुठे वावरत आहोत, आजुबाजुने जाणारे लोक आपल्याकडे पाहून काय विचार करत असतील, त्यांपैकी आपल्या कोणी परिचयाचे किंवा नातेमंडळीतील आहेत का याचे जराही भान नसते किंबहुना त्याची त्यांना पर्वाही नसते. रिल्सच्या आहारी गेलेल्या या मंडळींना आपला हा नाद आपल्याला वास्तव जगतापासून दूर घेऊन जात आहे याचे जराही भान नसते. युट्युबवर रिल्स आणि व्हिडीओ बनवून लक्षावधी फॉलोअर्स आणि युजर्स गोळा केलेले अनेक युट्युबर्स आज युट्युबकडून प्रतिमास लाखो रुपये वेतन घेत आहेत. यापैकी कितीतरी जण साधे सातवीची परीक्षाही उत्तीर्ण झालेले नाहीत. सध्याच्या युगात यशस्वी व्हायचे असेल, प्रसिद्धी मिळवायची असेल आणि पैसा कमवायचा असेल, तर त्यासाठी शिक्षण अनिवार्य नसून लोकांना आवडतील अशा रिल्स बनवता आले पाहिजे असा चुकीचा संदेश आजच्या तरुण पिढीवर बिंबु लागला आहे. आई बाबांनी ज्यांची कधी नावेही कुठे ऐकली अथवा वाचली नाहीत असे युट्यूबर्स आजच्या पिढीच्या गळ्यातील ताईत बनू लागले आहेत. त्यामुळे शालेय जीवनापासूनच विद्यार्थी रिल्स बनवून ते अपलोड करू लागले आहेत. रिल्समध्ये सायकल्सवर , बाईक्सवर केलेले स्टंट पाहून ते स्वतः करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत आणि त्या नादात स्वतःचे हातपाय तोडून घेऊ लागले आहेत. तरुणांकडून पैसे उकलण्याचा उद्देशाने तयार केलेल्या अश्लील रिल्सच्या नदी लागून अनेक तरुण आज आर्थिक फसवणुकीला बळी पडू लागले आहेत. केवळ तरुण वर्गालाच नव्हे, तर शालेय विद्यार्थ्यांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच आज रिल्स पाहण्याचे वेड लागले आहे. रिल्स पाहण्यात तासन तास कसे निघून जातात याचा पत्ताही लागत नाही. आपणा सर्वांना प्रतिदिन खरोखरच मनोरंजनाची एव्हढी आवश्यकता आहे का ? मनोरंजनाच्या नादात आपला कितीतरी बहुमुल्य वेळ आपण असाच वाया घालवत असतो. विज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आज सुखाची अनेक साधने आपल्या पायाशी लोळण घेत आहेत मात्र या सर्वांचा उपभोग घेत असताना आपण अनेक शारीरिक-मानसिक विकारांना आणि दोषांना निमंत्रण देत आहोत, स्वतःची हानी करून घेत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ?

**– जगन घाणेकर,**
**घाटकोपर,**
**मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## बीड भूसंपादन....

अतिरिक्त मोबदला मंजूर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तपासानुसार, अविनाश पाठक यांची बदली एप्रिल २०२५ मध्ये झाल्यानंतरही त्यांच्या कार्यकाळातील जुन्या तारखा वापरून आदेश जारी करण्यात आले. एकूण १५४ प्रकरणांमध्ये सुमारे २४१ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आल्याचे समोर आले आहे. यापैकी जवळपास ७३ कोटी रुपयांचे वाटप संबंधित खातेदारांना करण्यात आले असल्याची माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे. या प्रकरणी यापूर्वीच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये अविनाश पाठक यांचेही नाव समाविष्ट होते. विशेष म्हणजे, वाढीव मोबदल्यासंदर्भातील अनेक आदेशांची अधिकृत नोंद किंवा रजिस्टर उपलब्ध नसल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. या घोटाळ्यामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून पुढील तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## दहावीचा निकाल....

आणि 7) https://education.indianexpress.com/.../maharashtra-ssc... परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. त्याचप्रमाणे ऊळसळश्रेलज्ञशी -र्ि मध्ये ऊळसळींरश्र गुणपत्रिका संग्रहित करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच https://mahahsscboard.in (in school login) या संकेतस्थळावर शाळांना त्यांच्या शाळांचा एकत्रित निकाल उपलब्ध होईल. ऑनलाईन निकालानंतर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरून स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या असल्याचे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## बीड, सोलापूरसह....

आहेत. वाढलेला उकाडा, तीव्र उन्हाचा चटका आणि बदलते वातावरण यामुळे पूर्वमोसमी पावसासाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण व दमट हवामान कायम राहणार आहे. दरम्यान, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी, प्रवासी आणि नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने म्हटले आहे. बुधवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत राज्यातील अनेक भागांत उष्णतेची लाट कायम होती. वर्धा, अमरावती, गडचिरोली, अकोला, वाशीम, ब्रह्मपुरी आणि चंद्रपूर येथे तापमानाचा पारा ४२ अंशांच्या पुढे गेला. तर सोलापूर, परभणी आणि यवतमाळ येथे तापमान ४१ अंशांहून अधिक नोंदवले गेले. दुसरीकडे, महाबळेश्वर येथे राज्यातील सर्वात कमी १५.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार शनिवारनंतर राज्यातील हवामान पुन्हा कोरडे होण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी राहावे, उघड्यावर जाणे टाळावे तसेच हवामान विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अनिशा ग्लोबल...

आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असल्याची भावना क्रीडाप्रेमींमधून व्यक्त होत आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, तिला मिळालेल्या मार्गदर्शन व कठोर मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. कु. प्रगती जगदाळे हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, भविष्यात ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## धांडे नगर....

सुतक नसल्याचे दिसत असून पाणी पुरवठा विभागाच्या डोळ्याला लासूर झाले आहे का? असा संतप्त सवाल बीडकरांमधुन उपस्थित होत आहे. यंदा बीडमध्ये तापमानात कमालीची वाढ झाली असून सुर्य आग ओकू लागला आहे. उन्हामुळे जीवाची लाही-लाही होत असतांना शहरातील काही भागांमध्ये पाण्यासाठी नागरिकांची तारांबळ उडत आहे. त्यातच शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मेन पाईप लाईन जी बार्शी रोड लगत असलेल्या धांडे नगर कमानी जवळ गेल्या पंधरा-वीस दिवसांपासून लिकेज मुळे रात्रंदिवस लाखो लिटर पाणी वाया जात आहे. या पाईप लाईन मोठमोठी छिद्रे पडले असून यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होता आहे. परंतू याकडे पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने डोळेझाक केल्याचे दिसत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असून भर उन्हाळ्यात पाणी अश्याप्रकारे वाया जात असतांना पाण्याचा जपून वापर करा असा संदेश देणाऱ्या प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे पाणी वाया जात असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

## थकीत ऊस ....

प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला. गेल्या चार महिन्यांपासून केवळ पोकळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी आता आरपारची भूमिका घेतली आहे. येत्या तीन दिवसांत थकीत देयके, वाहतूक खर्च आणि तोडणी मजुरांची मजुरी अदा न केल्यास ८ मे रोजी साखर कारखान्याला टाळे ठोकण्याचा खणखणीत इशारा यावेळी देण्यात आला. भर उन्हात झालेल्या या आंदोलनात एड. अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. वारंवार निवेदने देऊनही कारखानदारांनी दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा असा आर्त सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

## आत्महत्याग्रस्त शेतकरी.....

प्रवेशासाठी महत्त्वाची मानली जाणारी उएढ परीक्षेची फी देखील संस्थानकडून भरली जाणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबण्याची शक्यता कमी होणार आहे.

भविष्यात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम करण्यासाठी NEET आणि JEE सारख्या परीक्षांसाठीही मोफत मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी संस्थानने दर्शवली आहे. गोरक्ष गाडीलकर यांनी या योजनेची माहिती देताना सांगितले की, शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत थांबू नये, हा संस्थानचा मुख्य उद्देश आहे

## जिल्हा रुग्णालयातील...

रुग्णालयाच्या शल्यचिकित्सकांच्या ताब्यात असलेला युजर आयडी व पासवर्ड यांचा गैरवापर करुन बोगस प्रमाणपत्र काढण्यात आली आहेत. मात्र, याबाबत अद्यापपर्यंत पोलिसांनी ज्यांच्याकडे हा पासवर्ड जतन करण्याची जबाबदारी होती त्या अधिकाऱ्यांवर काहीही कारवाई केलेली दिसत नाही. काही एजंटला अटक करण्यात आली. तसेच जिल्हा रुग्णालयातील एका मयत कंत्राटी कर्मचाऱ्याला यात आरोपी करण्यात आले आहे. मात्र, मुळात शासकीय गोपनीय पासवर्ड व युजर आयडी या एजंटकडे व इतरांकडे गेला कसा? याचे उत्तर पोलिस शोधायला तयार नाहीत. त्यास ते टाळाटाळ करत आहेत. युजर आयडी व पासवर्ड जतन करण्याची जबाबदारी ही रुग्णालयाच्या शल्यचिकित्सकांची आहे याबाबत दिव्यांग आयुक्तालयाने पोलिसांना लेखी कळवलेले आहे. ज्या संगणकावरुन ही बनावट प्रमाणपत्र काढली गेली त्याचा अहवाल थेट दिल्ली येथून केंद्र शासनानेही पोलिसांना पाठविला आहे. नाशिकच्या आरोग्य उपसंचालक कार्यालयानेही याबाबत चौकशी करुन पासवर्ड गैरवापरास रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांना दोषी धरलेले आहे. मात्र, सगळे लेखी पुरावे असतानाही आर्थिक गुन्हे शाखा प्रकरण दडपत आहे. पोलिसांनी जिल्हा रुग्णालयातून वेगवेगळ्या प्रकारचे रेकॉर्ड ताब्यात घेतले. त्यात काही खळबळजनक दस्तावेज पोलिसांना मिळाल्याचे समजते. त्याआधारे लोकांना चौकशीसाठीही बोलविले जात असल्याचे समजते. मात्र, या चौकशीनंतर पुढे पोलिसांनी काय केले? ते काहीही समोर आलेले नाही. ज्यांना बोगस प्रमाणपत्र मिळाली त्यांची पोलिस चौकशी करत आहेत. मात्र, युजर आयडीचा गैरवापर करुन ज्यांनी ही प्रमाणपत्र दिली त्यांचा शोध घेणे टाळले जात आहे.

महिला शिक्षिकेच्या तक्रारीकडेही पोलिसांचे दुर्लक्ष- मी जिल्हा रुग्णालयात न येता माझ्या नावाने जिल्हा शल्यचिकित्सकांनी 'मी शेती करण्यास असमर्थ आहे' असे खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले, अशी लेखी तक्रार शेख गजाला परवीन हसन या शिक्षिकेने वारंवार तोफखाना पोलिस व पोलिस अधीक्षकांकडे दिली. मात्र, या तक्रारीवरुनही पोलिसांनी अद्याप चौकशी केलेली नाही. सदर शिक्षिका त्यादिवशी शाळेत हजर असल्याचे जिल्हा परिषदेचे दप्तर सांगते. मात्र, डॉ. बापूसाहेब गाढे यांच्या समितीने ही महिला स्वतः प्रमाणपत्र घेण्यासाठी आली असा अहवाल दिला आहे. पोलिसांनी या तक्रार अर्जावर काय चौकशी केली?, हाही प्रश्न आहे.

पोलिस अधीक्षक सुदर्शन काय करणार? पूर्वीच्या पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणाची चौकशी करु असे सांगितले. प्रत्यक्षात कारवाई केली नाही. दिव्यांग घोटाळ्यातील गुन्ह्यांचा आजवर या सर्वच पोलिस स्टेशनने तपास का टाळला?, याबाबत नवीन पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन काय कारवाई करणार याबाबत उत्सुकता आहे. तोफखाना पोलिसांनी पहिले दीड वर्षे घोटाळ्यावर काहीच चौकशी केली नाही. त्यामुळे तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे आला. पण तपास न करणाऱ्या तेव्हाच्या तपासी अधिकाऱ्यांची काय चौकशी झाली हे समजू शकलेले नाही.

दिव्यांग प्रमाणपत्रावर आरक्षण, शासकीय नोकरी- अनेकांनी दिव्यांग नसताना तशी प्रमाणपत्र मिळवून शासकीय नोकऱ्या मिळवल्या आहेत. काही अधिकारी व डॉक्टरांच्या मुलांनीही दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे चक्क शिक्षणात विविध अभ्यासक्रमात प्रवेश मिळविल्याची चर्चा आहे. ही प्रमाणपत्र खरी व योग्य आहेत का?, हा प्रश्न आहे. पण, आरोग्य विभाग ही तपासणी करत नाही व पोलिसही आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करत आहेत. अहिल्यानगर शहरातील अटक करण्यात आलेल्या एजंटने अनेकांना ही प्रमाणपत्र मिळवून दिल्याची चर्चा आहे. पण, या एजंटने अशी किती प्रमाणपत्र तयार केली ती माहिती आर्थिक गुन्हे शाखेने पुढे आणलेली नाही.

◆ पान ४ वरून पुढे...

## मोठेवाडीत कायद्यालाच....

असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. गरीब आणि सामान्य माणसासाठी वेगळा न्याय आणि पैशावाल्यांसाठी वेगळे नियम का? अशी चर्चा आता मोठेवाडी परिसरात उघडपणे सुरू झाली आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या आरोपांमुळे मोठेवाडी बिट परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांचे लक्ष आता पोलिस प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

## उष्णतेत होरपळणाऱ्या...

समजत नाही. उष्णतेत जगायचं कसं? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. महावितरण प्रशासनाने तात्काळ सुरळीत वीजपुरवठा करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांकडून देण्यात आला आहे.

## अल्पसंख्यांक संरक्षणासाठी...

अधिक तीव्र केली आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील जालना रोड येथे ४ मे रोजी सायं.०७:०० वाजता समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत समितीच्या कार्याचा आढावा घेण्यात आला असून, लवकरच तालुका निहाय समित्यांची बांधणी करून आंदोलन अधिक व्यापक करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करण्यासाठी संघटित व प्रभावी लढा उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. गेल्या काही वर्षांत अल्पसंख्यांक समाजावर होणार्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले. हेट स्पीच, दंगली आणि मॉब लिंचिंगसारख्या गंभीर घटनांमुळे समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर अशा घटनांवर कठोर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने तातडीने अल्पसंख्यांक संरक्षण कायदा लागू करावा, अशी मागणी बैठकीत ठामपणे मांडण्यात आली. दरम्यान, या मागणीसाठी १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीच्या वतीने लाक्षणिक उपोषणही करण्यात आले होते. पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी संघटनात्मक बळकटीवर भर देत तालुका स्तरावर समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. समितीच्या वतीने लवकरच मोठ्या प्रमाणावर जनजागृती आणि आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. या बैठकीत अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीचे मुजतबा खान सर,प्रा.इलियास इनामदार, प्रा.शेख अमर, एडवोकेट जेबा शेख, शेख मुसा सर,एड. मोमीन अखिल, मुशीर इनामदार,शेख अखिल अण्णा,शेख मैनूद्दीन,पत्रकार पठाण अमरजान,सलीम खान, पाले खान,डॉ.मोसीन शेख,शेख ऐहेतेशाम,सय्यद नबिलउज्जमा, एड.जावेद मणियार,शामिर खान,आबेद कादरी,शेख खदीर,शेख नदीम,शेख जावेद सह इतर सामाजिक व राजकीय प्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चुकीच्या उपचाराने....

डॉक्टर कल्पना गित्ते यांचे परळीमध्ये आलिशान खाजगी रुग्णालय आहे. वैजनाथ मुंडे यांनी त्यांच्या पत्नीला गरोदर राहिल्यापासूनच कल्पना मुंडे यांच्याकडे उपचार घेण्यासाठी आणले होते. प्रसूतीसाठी जेव्हा त्यांनी आपल्या पत्नीला या रुग्णालयात दाखल केले, तेव्हा पत्नीवर योग्य उपचार केल्याचे डॉक्टर कल्पना गीते यांनी वैद्यकीय भाषेत सांगितले होते. आता आता प्रकरणात सारवासारव केली असून बाळ आईच्या पोटात मृत होऊनही त्याला बावीस तास पोटातच का ठेवण्यात आले ? असा देखील प्रश्न उपस्थित केला जात आहे.तज्ज्ञ डॉक्टरांची चौकशी समिती- गर्भातच बाळाचा मृत्यू झाल्याने मुडे कुटुंबीय प्रचंड तणावात आहे. आणि त्यातच डॉक्टरांनी उपचारादरम्यान कुठलंही सहकार्य केले नाही. परळीत वैद्यकीय क्षेत्राला डाग लावणारा गंभीर प्रकार या डॉक्टरांनी केल्याचा कुटुंबियांचा आरोप आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरांविरोधात आता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हाधिकारी आणि परळी शहर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाईची मागणी होताच बीडच्या जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीशकुमार साळुंके याप्रकरणी तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमली असून चौकशीचे आदेश दिले आहेत.

## डॉ. गणेश ढवळे...

जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख म्हणूनही कार्यरत आहेत. हा विशेष पुरस्कार सोहळा दि. १० मे रोजी जीव्हीटी कृषीकुल, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ येथे संपन्न होणार असून, जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ डॉ. तात्याराव लहाने, रावसाहेब घुगे तसेच मेघना झुझम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. समाजात प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दैनिक लोकनेता परिवाराचे मुख्य संपादक ज्ञानेश्वर मुंडे व उपसंपादक विजय रोडे यांनी दिली. डॉ. गणेश ढवळे यांच्या या निवडीबद्दल सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच शुभचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उभ्या चारचाकी....

चारचाकी वाहनाला यापूर्वीही काही महिन्यांपूर्वी आग लागल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. असे असतानाही संबंधित वाहन त्या ठिकाणाहून हटविण्यात आले नाही किंवा कोणत्याही प्रकारच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आल्या नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, मोकळ्या जागेत धोकादायक अवस्थेत वाहने उभी ठेवण्याबाबत प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पाटोदा नगर पंचायत....

हमीपत्र म्हणून स्वीकारले आणि जिल्हाधिकार्यांना चार आठवड्यांच्या आत निकाल देण्याचे निर्देश देऊन ही रिट याचिका निकाली काढली. या प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ड. नरसिंह जाधव यांनी काम पाहिले, तर शासनाच्या वतीने एजीपी मिस नेहा बी. कांबळे यांनी बाजू मांडली. राजकीय दबाव ; उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही प्रकरण दोन वर्षांपासून प्रलंबित पाटोदा नगर पंचायतचे दोन सदस्य (१. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बीड- सय्यद अब्दुल्ला २. माजी नगराध्यक्ष पाटोदा- बळी पोटे) या दोघांचे नगरसेवक अपात्रता प्रकरण बीड जिल्हाधिकार्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून निकालासाठी प्रलंबित असून, उच्च न्यायालयाने यापूर्वी देखील निर्णय जाहीर करण्याबाबत निर्देश दिले असतानाही केवळ राजकीय दबाव असल्याने हे प्रकरण निकालासाठी लाल फीतीत अडकवून ठेवण्याचे काम जिल्हा प्रशासनाकडून सुरू असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान जिल्हा प्रशासन राजकीय दबावाखाली उच्च न्यायालयाच्या निर्देशावर कारवाई करण्यात हलगर्जीपणा करत असेल तर सर्व सामान्य जनतेला जिल्हा प्रशासनाकडून काय न्याय मिळणार आहे असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## केज येथे पोलिस....

सं. १२३, २७४, २७५, २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल बालासाहेब डापकर, पोलिस कॉन्स्टेबल राजू गुंजाळ यांच्यासह पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, पोलिस हेडकॉन्स्टेबल अनिल मंदे, संतोष गित्ते, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे, पोलिस कॉन्स्टेबल चंद्रकांत काळकुटे, अशपाक इनामदार यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे**, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### राष्ट्रीय लोकअदालत शनिवारी

**छ. संभाजीनगर ।** प्रतिनिधी

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने शनिवार दि. ९ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांसह जिल्हा व सत्र न्यायालयात ही लोकअदालत पार पडणार आहे. दुरावलेले संबंध, प्रलंबित तसेच दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यासाठी या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये तडजोडपात्र दिवाणी, फौजदारी, बँक वसुली, कामगार वाद, वीज व पाणी देयक, पैसे वसुली, भूसंपादन, महसूल, कामगार व औद्योगिक वाद तसेच वैवाहिक वादासंदर्भातील विविध प्रकरणांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधितांनी आपली प्रकरणे ज्या न्यायालयात प्रलंबित आहेत त्या न्यायालयात अर्ज करावा. दाखलपूर्व प्रकरणांसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे ८५९१९०३६२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश गिरीश रा. अग्रवाल तसेच सचिव श्रीमती वैशाली पी. फडणीस यांनी केले आहे.

### व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांची नॅशनल स्टॉक एक्सचेंजला भेट



**मुंबई ।** प्रतिनिधी

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी मुंबईतील नॅशनल स्टॉक एक्सचेंज (छडए) मुख्यालयाला भेट देत प्रतिष्ठित 'एनएसई बेल' वाजवली. यावेळी त्यांनी एनएसईच्या कामकाजाची माहिती घेत भारतीय वित्तीय व्यवस्थेची पाहणी केली. मुंबईतील बीकेसी येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी आज शिष्टमंडळासह भेट दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी एनएसईचे अध्यक्ष श्रीनिवास इंजेटी यांनी स्वागतपर भाषण केले. यावेळी श्री. इंजेटी म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष तो लाम यांची भारतातील ही पहिली अधिकृत भेट आहे. राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी भारतीय वित्तीय क्षेत्राशी संवादासाठी एनएसईची निवड केल्याने या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत आणि व्हिएतनाम हे दोन्ही देश उत्पादन, तंत्रज्ञान आणि भांडवली बाजाराच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करत आहेत. फेब्रुवारी २०२४ मध्ये भारतातील उत्पादन प्रकल्पासाठी भूमिपूजन झाल्यानंतर अवघ्या १८ महिन्यांत पहिल्या वाहनाचे उत्पादन सुरू झाले आहे. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १६ अब्ज डॉलरच्या पुढे गेला असून २०३० पर्यंत तो २५ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर राष्ट्राध्यक्ष तो लाम आणि व्हिएतनामी प्रतिनिधीमंडळाने एनएसईच्या ट्रेडिंग व ऑपरेशन्स सुविधांची पाहणी केली.

### परमात्म्याच्या प्राप्तीतच मनुष्याला परमलाभ साध्वी अनुराधा दीदी पंढरपूरकर यांचे प्रतिपादन



**बीड ।** प्रतिनिधी

परमात्म्याच्या प्राप्तीतच खरा परमलाभ आहे, ही भावना संत सामान्यांच्या मनात निर्माण करतात. जीवाच्या ठायी असलेले भोग, माया आणि मोह दूर करून खऱ्या शांतीचा मार्ग दाखवणारेच खरे संत असतात. माणसाने आपल्या मनाची आणि विचारांची दिशा बदलली, तरच दुःखाची तीव्रता कमी होते, असे प्रतिपादन प्रसिद्ध निरुपणकार साध्वी अनुराधा दीदी पंढरपूरकर यांनी केले. येथील स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात 'संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र कथा' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.७) या कथा सोहळ्याचे तिसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड यांच्या हस्ते साध्वी अनुराधा दीदींचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

### जुन्या पेंन्शनची वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू

**बीड ।** प्रतिनिधी

जुन्या पेन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची कार्यपद्धती, नियम, अटी लागू करणारे परिपत्रक राज्य सरकारने काल जारी केले त्यामुळे राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीवेळी शेवटच्या वेतनाच्या पन्नास टक्के रक्कम पेन्शनपोटी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारी निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समितीने या शासन निर्णयाचे स्वागत केले असून कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा हा विजय असल्याचे म्हटले आहे. जिल्हा समन्वय समितीचे निमंत्रक तथा मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, अंशदायी पेंन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी राज्यातील सरकारी निमसरकारी कर्मचारी शिक्षक आग्रही होते. अंशदायी पेंन्शन योजना लागू झाल्यापासून संघटना त्यास विरोध करित आहेत. मार्च २०२३ मधे समन्वय समितीने त्यासाठी बेमुदत संप केला तेंव्हा सरकारने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक सुरक्षा मान्य केली. सुबोधकुमार समिती नियुक्त करून जुन्या पेंन्शनची सर्व वैशिष्ट्ये असलेली सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचे आश्वासन दिले.

# "एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे"

**परभणी ।** प्रतिनिधी



थॅलेसेमिया हा रक्ताचा गंभीर अनुवंशिक आजार असून तो आई-वडिलांकडून मुलांमध्ये संक्रमित होतो. या आजारामध्ये शरीरात पुरेशा प्रमाणात हिमोग्लोबीन तयार होत नसल्याने रुग्णांना वारंवार रक्त संक्रमण करावे लागते. सतत रक्त संक्रमणामुळे शरीरात लोहाचे प्रमाण वाढून हृदय, यकृत आणि इतर अवयवांवर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे रुग्णांना नियमित औषधोपचार आणि वैद्यकीय देखरेखीची आवश्यकता असते.

थॅलेसेमिया मेजर हा या आजाराचा गंभीर प्रकार असून तो बालपणापासून दिसून येतो. तर थॅलेसेमिया मायनर असलेल्या व्यक्ती सामान्यतः निरोगी असतात, मात्र त्या या आजाराच्या वाहक असतात. दोन वाहकांचा विवाह झाल्यास त्यांच्या संततीमध्ये थॅलेसेमिया मेजर होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे विवाहपूर्व तपासणी व समुपदेशनाला विशेष महत्त्व देण्यात येत आहे.

जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त दि. ८ मे २०२५ रोजी राज्यात एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानांतर्गत राज्यभर थॅलेसेमिया प्रतिबंध, तपासणी, उपचार आणि जनजागृतीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या स्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. थॅलेसेमिया फेडरेशन, रोटरी क्लब आणि सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने जिल्हास्तरावर बैठका घेऊन तपासणी, उपचार आणि प्रतिबंधात्मक नियोजन केले जात आहे. रुग्णांच्या आवश्यकतेनुसार तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत असून सीबीसी, सिरम फेरिटिन, एमआरआय, सोनोग्राफी, २ डी इको आदी तपासण्या करण्यात येत आहेत. तसेच थॅलेसेमिया रुग्णांना नियमित औषधपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांतील रक्त साठवणूक केंद्रांशी समन्वय साधून रुग्णांना रक्त संक्रमण सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासोबतच थॅलेसेमिया रुग्णांना नियमित दिव्यांग प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया देखील राबविली जात आहे.

माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विवाहयोग्य युवक-युवती आणि गरोदर महिलांचे प्रशिक्षित अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत समुपदेशन करण्यात येत आहे. विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणीबाबत जनजागृती करण्यासाठी वधू-वर सूचक मंडळांनाही अभियानात सहभागी करण्यात आले आहे.

विविध प्रसारमाध्यमांव्दारे थॅलेसेमियाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणेला सक्षम करण्यासाठी जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, एएनएम आणि समन्वयकांचे विशेष प्रशिक्षणही पूर्ण करण्यात आले आहे.

गडचिरोली येथे कॉम्प्रिहेन्सिव्ह डे केअर सेंटर सुरू करण्यात आले असून नंदुरबार येथेही असे केंद्र सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे सीव्हीएस जेनेटिक टेस्ट मोफत उपलब्ध करण्यात आली आहे.

शासनाच्या मुख्यमंत्री सहायता निधी, कोल इंडिया निधी आणि प्रधानमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून राज्यातील ९० बालकांवर बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी ९.५ लाख ते १७ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्यालाही शासनाने मान्यता दिली आहे.

## रस्तासुरक्षा सरप्राईज गिफ्ट्सचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते वितरण

**नांदेड ।** प्रतिनिधी





वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि 'सेफर इंडियन रोड्स' यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते उदात्त कार्यक्रमाचा शुभारंभ आज महात्मा ज्योतिबा फुले पुतळा परिसर आयटीआय चौक येथे करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत कंकरेज, वाहतूक पोलीस इन्स्पेक्टर भागवत नागरगोजे हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हेल्मेट आणि सीट बेल्ट घालून वाहतुकीचे नियम व कायदे पाळणाऱ्या नागरिकांना रस्ते सुरक्षा सरप्राईज भेटवस्तू आणि रस्ते चिन्हांचा तक्ता देऊन सन्मानित केले. नागरिकांशी बोलताना, त्यांनी रस्ते चिन्हांच्या तक्त्याचे प्रकाशन केले. जो शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि शाळांना दिला जाईल. ते म्हणाले की, रस्ते सुरक्षा ही एक सामायिक जबाबदारी आहे आणि प्रत्येक रस्ता वापरकर्त्याने वाहतुकीचे नियम व चिन्हे यांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. तसेच त्यांनी इतर रस्ता वापरकर्त्यांचा आदर करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, मोटार आणि मानवी लोकसंख्येच्या झपाट्याने वाढीमुळे धोकादायक रस्ता वापरकर्त्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण झाले आहे आणि जीवघेणे रस्ते अपघात थांबवण्यासाठी प्रत्येक रस्ता वापरकर्त्याने आदराने रस्ते सुरक्षेचे पालन केले पाहिजे. कार्यक्रमात पोलीस वाहतूक नांदेडचे संतोष तिडके, श्रीमती शिवकांथा जयलवालजी, घनशाम ओझा, परीक्षित ओझा,

## माणसाची संगतच त्याचे भविष्य ठरवते वेदविभूषण उद्बोध महाराज यांचे प्रतिपादन



**बीड ।** प्रतिनिधी

माणसाची संगत बदलली की आयुष्य परिवर्तनशील होते. संतांच्या संगतीत जीवनाची खरी सार्थकता दडलेली आहे, त्यामुळे प्रत्येकाने आपली संगती तपासावी. आजच्या डिजिटल आणि अल्गोरिदमच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर विचाराने व्हायला हवा, कारण माणूस जसा विचार आणि कृती करतो, त्यावरच त्याचे भविष्य अवलंबून असते,असे मौलिक विचार वेदविभूषण उद्बोध महाराज (श्रीक्षेत्र देऊळगावराजा) यांनी येथे व्यक्त केले. शहरातील स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'श्री नवनाथ कथासार' या संगीतमय कथेच्या तिसऱ्या दिवशी गुरुवारी (दि. ७) ते बोलत होते. कथेच्या प्रारंभी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खटोड व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते महाराजांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. यावेळी निरूपण करताना महाराज पुढे म्हणाले, साधुत्वाची खरी ओळख त्याग आहे. संपत्तीच्या संचयात नेहमीच भय असते, त्यामुळे गरजेपेक्षा जास्त संपत्तीचा मोह करू नये. त्यातून त्यागाची वाटचाल सुकर होईल.

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत कुस्ती व लॉन टेनिस खेळांसाठी आज विभागीय निवड चाचणी

**छ. संभाजीनगर ।** प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत मिश्न लक्ष्यवेध योजनेअंतर्गत कुस्ती व लॉन टेनिस खेळांसाठी विभागीय निवड चाचण्या शुक्रवार दि.८ मे रोजी विभागीय क्रीडा संकूल छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे, असे क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी कळविले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत मिशन लक्ष्यवेध योजना ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत आहे. या जनेतंर्गत लॉन टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन आणि बॉक्सिंग या क्रीडा प्रकाराकरीता विभागीय क्रीडा निपुणता केंद्र विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यात येत आहे. या केंद्रांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग व खेळाडूंसाठी वैद्यकीय विमा सुरक्षा सुविधा शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उपरोक्त नमुद विभागीय क्रीडा निपुणता केंद्र विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कुस्ती व लॉन टेनिस या खेळांसाठी खेळाडूंच्या निवड चाचण्यांचे आयोजन शुक्रवार दि.८ मे रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे.

खेळाडू निवड चाचणी करीता निकष खालीलप्रमाणे: १. लॉन टेनिस : वयोमर्यादा २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी), आवश्यक कागदपत्रे- जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ. महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे. क्रीडा कामगिरी विवरण- Top 3 Rank Players in AITA, National Ranking Player, राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SGFI, AITA, Khelo India National Only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (Fitness) चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक. शासनमान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य

२. कुस्ती : वयोमर्यादा २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी), आवश्यक कागदपत्रे- जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ. महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे. क्रीडा कामगिरी विवरण-राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SGFI, WFI, Khelo India National Only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (Fitness) चाचण्यांमध्ये पात्र होणे. शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. नैपूण्यप्राप्त खेळाडूंनी चाचण्यांसाठी उपस्थित रहावे,असे आवाहन उपसंचालक शेखर पाटील यांनी केले आहे.

निवड चाचणीचे ठिकाण : विभागीय क्रीडा संकुल, सुतगिरणी चौक, छत्रपती संभाजीनगर-४३१००९. निवड चाचणीची वेळ: शुक्रवार दि.८ मे, सकाळी १० वा. पासून, उपस्थिती : सकाळी साडेनऊ वाजता . संपर्क क्रमांक: तेजस कुलकर्णी (क्रीडा अधिकारी)-८०८७६६१५८९

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क

**धाराशिव ।** प्रतिनिधी

जिल्ह्यात अल्प पर्जन्यमानाची शक्यता आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.तुळजापूर,उमरगा आणि लोहारा तालुक्यातील सात पाटबंधारे प्रकल्पांमध्ये सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा पुढील आदेशापर्यंत पिण्याच्या वापरासाठी आरक्षित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत. उपकार्यकारी अभियंता,धाराशिव पाटबंधारे विभाग क्र.२,उमरगा यांच्या कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार,अल्प पावसामुळे आगामी काळात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित प्रकल्पांमधील उपलब्ध पाणीसाठा जतन करण्याची शिफारस करण्यात आली होती.

# आदित्य कृषी महाविद्यालयात 257 विद्यार्थ्यांना निरोप

# संस्कारांची शिदोरी घेऊन भावी अधिकारी नव्या क्षितिजाकडे

**बीड ।** प्रतिनिधी

निरोप समारंभ हा केवळ आठवणींना उजाळा देणारा क्षण नसून नवीन संधी आणि कर्तृत्वाच्या प्रवासाची ती एक सुरुवात आहे. महाविद्यालयातील संस्कार आणि ज्ञान तुमच्या आयुष्याच्या पुढील प्रवासात नक्कीच दीपस्तंभासारखे काम करेल, स्वप्न पूर्ण करण्यासाठी अपार कष्ट करा असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांनी केले.



आदित्य कृषी महाविद्यालयात अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभ आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा हे होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, आजचा दिवस संमिश्र भावनांचा आहे. विद्यार्थ्यांना निरोप देताना शिक्षकांच्या मनात हळहळ असली, तरी तुम्ही आयुष्याच्या नवीन टप्प्यावर यशस्वी व्हाल याचा आम्हाला अभिमान आहे. विद्यार्थ्यांनी या पवित्र प्रांगणात घेतलेल्या ज्ञानाच्या जोरावर आदित्य शिक्षण संस्थेचे नाव मोठे करावे. तर प्राचार्य श्याम भुतडा म्हणाले की, निरोप म्हणजे कायमचे दूर जाणे नव्हे, तर नवीन जबाबदाऱ्यांकडे वाटचाल करणे होय. आयुष्यात कितीही मोठ्या पदावर गेलात तरी माणुसकी जपा, असे आवाहन त्यांनी केले. प्राध्यापक व्हि.एस. मिसाळ यांनी प्रास्ताविकात विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअरबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. सुरज जाधव याने आपला प्रवास सांगताना संस्था नेहमीच पाठीशी उभी राहिल्याचे नमूद केले. तर सुगंधा कुंभार हिने प्राध्यापकांचे कष्ट आणि महाविद्यालयातील सर्वांगीण विकासाच्या संधींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. ठोके, डॉ. सातपुते, डॉ. खेडकर, डॉ. मुंडे, डॉ. मोरे, प्रा. मिसाळ, डॉ. एडके, डॉ. कुमार, प्रा. गव्हाणे, प्रा. बोरडकर, प्रा. धावणे, प्रा. राऊत यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहाव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बीड पिंपळनेर रस्त्यावर दोन दुचाकीचा अपघात एक ठार ; दोन जखमी



**पिंपळनेर । प्रतिनिधी–** बीड तालुक्यातील बीड पिंपळनेर रस्त्यावर नागपूर फाट्या दरम्यान दि.७रोजी पहाटे दोन भरधाव मोटरसायकलची समोरा समोर धडक झाल्याने त्यात अंगद जगन्नाथ पटाईत वय ३९ हे गंभीरित्या जखमी झाले होते नंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला.तर दोघांना उपचारासाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते .नंतर त्यांना संभाजीनगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले .

# आष्टीत 7 दिवसांत धुमस्टाईल सोनेचोरीच्या 5 घटना; 'लाडक्या बहिणी' दहशतीखाली




**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरात गेल्या आठवड्याभरापासून जबरी चोरीच्या घटनांनी उच्छाद मांडला आहे. बुधवारी रात्री आष्टी दूध संघासमोर दुचाकीवरून जात असलेल्या दोन महिलांना पाठीमागून आलेल्या चोरट्यांनी अडवून त्यांच्या अंगावरील दागिने हिसकावून नेले. विशेष म्हणजे, सात दिवसांपूर्वी एकाच दिवशी तीन ठिकाणी अशाच प्रकारे चोरी झाली होती. एकापाठोपाठ एक घडणाऱ्या या घटनांमुळे शहरातील 'लाडक्या बहिणी' घराबाहेर पडताना भयभीत झाल्या आहेत. रस्ते कामामुळे तपासात अडथळा– साबलखेड–आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम संथ गतीने सुरू असल्याने अनेक भागांतील सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. चोरट्यांना याची पूर्ण खात्री असल्याने ते बिनधास्तपणे महिलांना लुटत आहेत. कॅमेरे बंद असल्याने पोलिसांनाही चोरट्यांचा माग काढणे कठीण जात आहे.

गुन्हे दाखल, पण तपासाचे काय?– पोलिस दरवेळी गुन्हा दाखल करून घेतात, मात्र ठोस कारवाई होताना दिसत नाही. तपास सुरू आहे हे पालुपद ऐकून नागरिक आता वैतागले आहेत. चोरटे पोलिसांना उघडपणे आव्हान देत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

### लवकरच चोर पकडले जातील

**सोनसाखळी चोरांचा शोध घेण्यासाठी एक अधिकारी आणि चार कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. तांत्रिक तपासाच्या साहाय्याने लवकरच या चोरांच्या मुसक्या आवळल्या जातील. –शरद भुतेकर, पोलीस निरीक्षक, आष्टी.**

## मोठेवाडीत कायद्यालाच भाव ?
## आर्थिक व्यवहारातून आरोपी सोडल्याचे पोलिस हवालदारावर गंभीर आरोप

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी बिट परिसरात कार्यरत असलेले पोलीस हवालदार बलवंत साहेब कुमार काळे यांच्यावर गंभीर आरोप होत असून, आर्थिक व्यवहार करून काही प्रकरणांमध्ये आरोपींना जागेवरच सोडून दिल्याची चर्चा सध्या परिसरात जोर धरत आहे. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, मागील काही घटनांमध्ये संबंधित आरोपींवर कठोर कारवाई होणे अपेक्षित असताना आर्थिक सेटिंग करून प्रकरणे दाबण्यात आली. काही आरोपींना जागीच मुक्त करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे कायद्याचे रक्षकच जर पैशांच्या जोरावर गुन्हेगारांना अभय देत असतील, तर सामान्य माणसाने न्याय कुणाकडे मागायचा? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. या कथित प्रकारांमुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन होत

▸▸ उर्वरित पान २ वर



*बीड महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत यांच्या निवासस्थानी संतोष रासवे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परमेश्वर सोळंके, बाळासाहेब आडागळे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संतोष रासवे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला.*

## उष्णतेत होरपळणाऱ्या पाटोद्याला महावितरणचा शॉक
### वारंवार लाईट गुल होत असल्याने जनतेचा संताप

**पाटोदा । प्रतिनिधी**

सध्या संपूर्ण पाटोदा शहरासह तालुक्यात उष्णतेची तीव्र लाट सुरू असून नागरिक अक्षरशः होरपळत आहेत. तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना दुसरीकडे महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवसभर कडक उन्हाचा तडाखा सहन करावा लागत असताना रात्रीच्या वेळेसही लाईटचा लपंडाव सुरूच असल्याने नागरिकांना जागून रात्री काढाव्या लागत आहेत. पंखे, कुलर, एसी बंद पडत असल्याने उकाडा असह्य झाला आहे. त्यातच मच्छरांचा वाढता त्रास नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे.सततच्या लाईट गुलमुळे व्यापारी, लहान दुकानदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. अनेक दुकानदारांचे व्यवहार विस्कळीत झाले असून इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.लाईट कधी येते आणि कधी जाते हेच

▸▸ उर्वरित पान २ वर

## अल्पसंख्यांक संरक्षणासाठी संघर्ष समितीचा निर्धार; तालुका निहाय संघटन उभारणीसह व्यापक आंदोलनाची तयारी

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक समाजाच्या संरक्षणासाठी प्रभावी कायदा लागू करण्याच्या मागणीसाठी अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समितीने आपल्या आंदोलनाची दिशा

▸▸ उर्वरित पान २ वर

## चुकीच्या उपचाराने गर्भातील बाळाचा मृत्यू, पैशांसाठी २२ तास तसेच पोटात ठेवले, कुटुंबियांचा आरोप

**परळी । प्रतिनिधी**

परळीत एका खाजगी रुग्णालयाच्या निष्काळजीपणाने गर्भवती महिलेच्या जीवालाच धोका निर्माण झाल्याचा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला आहे. या महिलेला सुरुवातीपासूनच संबंधित डॉ. महिलेच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. चुकीच्या उपचाराने गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप संबंधित महिलेच्या पतीने केला आहे. त्यानंतर पैशांसाठी हे मृत बाळ या महिलेत्या पोटात २२ तास ठेवण्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे. परळीतील एका खाजगी रुग्णालयात एका गर्भवती महिलेवर आठ ते साडे आठ महिन्यांपासून ट्रीममेंट सुरु होती. डॉ.कल्पना गित्ते यांच्याकडे ही ट्रीटमेंट सुरु होती. आपल्या पत्नीवर चुकीचे उपचार केल्याने पोटातच बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप गर्भवती महिलेचे पती वैजनाथ मुंडे यांनी केला आहे. आपल्या पत्नीला प्रसूतीसाठी डॉ. कल्पना गित्ते यांच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, कल्पना गीते यांनी पोटामध्ये बाळ मृत झाल्यानंतरही प्रसूतीसाठी दाखल झालेल्या पत्नीवर उपचार करत असल्याचे कुटुंबियांना सांगितले. मात्र डॉक्टरच्या हलगर्जीने बाळ तर दगावलेच, पण त्यानंतर या बाळाच्या मातेची प्रचंड हेळसांड करुन तिच्याही जीवाशी खेळ केल्याचा प्रकार डॉक्टरांनी केल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी महिलेचे पती वैजनात मुंडे यांनी केली आहे.

▸▸ उर्वरित पान २ वर

## पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांना चार आठवड्यांची मुदत; उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे आदेश




**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्हाधिकार्यांकडे गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाटोदा नगर पंचायत सदस्य अपात्रता प्रकरणाचा निकाल पुढील चार आठवड्यांत जाहीर करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले आहेत.

शिवभूषण लक्ष्मणराव जाधव आणि शेख मोबीन शेख हमीद यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले. ॲड. नरसिंह जाधव यांच्यामार्फत याचिकाकर्ते शिवभूषण लक्ष्मणराव जाधव, शेख मोबीन शेख हमीद यांनी बीड जिल्हाधिकार्यांकडे (प्रतिवादी क्र. २) दाखल केलेल्या अपात्रता अर्ज क्रमांक १६७/२०२४ आणि अपात्रता अर्ज क्रमांक १६८/२०२४ वर तातडीने निकाल देण्याची मागणी याचिकेद्वारे केली होती. हा निकाल लवकरात लवकर, शक्यतो दोन आठवड्यांच्या आत लागावा अशी विनंती याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आली होती. या प्रकरणावर न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान सरकारी वकिलांनी सूचनांनुसार माहिती दिली की, सदर अर्जावरील निकाल पुढील चार आठवड्यांत घोषित केला जाईल. न्यायालयाने हे विधान

▸▸ उर्वरित पान २ वर

## डॉ. गणेश ढवळे यांना दैनिक लोकनेता 'समाजरत्न २०२६' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**बीड । प्रतिनिधी**

दैनिक लोकनेताच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यासाठी सन २०२६ चे मानकरी जाहीर करण्यात आले असून, बीड जिल्ह्यातील विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना प्रतिष्ठेचा 'समाजरत्न २०२६' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

ग्रामीण भागातील सरकारी शाळांच्या मुलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकरी, आरोग्य, रस्ते, वीज, पाणी, वृक्षलागवड तसेच विविध जनहिताच्या प्रश्नांवर अनोख्या व लक्ष्यवेधी आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. डॉ. ढवळे हे बीड

▸▸ उर्वरित पान २ वर

## उभ्या चारचाकी बसला आग
## अनर्थ टळला ! तात्काळ अग्निशामक दलाची धाव, आग आटोक्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील स्वराज्य नगर,गणपत नगर भागात मोकळ्या जागेत जीर्ण अवस्थेत उभ्या असलेल्या चारचाकी बसला अचानक आग लागल्याची घटना गुरुवारी (दि. ७) दुपारी घडली. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेचे अग्निशामक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि आग आटोक्यात



आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास मोकळ्या जागेत उभ्या असलेल्या बसमधून अचानक धूर व ज्वाळा निघू लागल्या. परिसरातील नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तत्काळ नगरपालिकेला माहिती दिली. त्यानंतर अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. दरम्यान, संबंधित

▸▸ उर्वरित पान २ वर

# केज येथे पोलिस पथकाची गुटख्यावर धाड, 11 लाखाचा मुद्देमाल जप्त

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिरपूरा येथे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांच्या पथकाने गुटख्यावर कारवाई करून स्कॉर्पिओ गाडीसह ११ लाखाचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांना ६ मे रोजी अशी माहिती मिळाली की, शिरपुरा (ता. केज) येथील शिवारात महादेव रत्नाकर घुले याने महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत पान मसाला, सुगंधीत तंबाखुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घरात साठा करून ठेवलेला आहे. माहिती मिळताच आय पी एस अधिकारी सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम



यांनी त्यांचे पथकातील पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर यांना कारवाईचे आदेश दिले.

आदेश मिळताच पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर आणि पोलिस हेडकॉन्स्टेबल बालासाहेब डापकर, पोलिस कॉन्स्टेबल राजू गुंजाळ, महिला पोलिस कॉन्स्टेबल राधा चव्हाण हे दोन पंचासह खाजगी वाहनाने शिरपूरा शिवारात रवाना झाले. व्यंकटराम यांच्या पथकाने शिरपुरा गावाच्या पश्चिमेस, शिरपुरा ते काळेगांव जाणारे रोडचे उत्तर बाजुस मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास छापा टाकला असता महादेव घुले यांची पत्नी घरी होती...

पोलिसांनी त्या घराची झडती घेतली असता त्या पश्चिममुखी घरातील पाठीमागच्या रुममध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व राज्यात प्रतिबंधीत केलेला डायरेक्टर स्पेशल, तंबाखू, आर एम डी पान मसाला, राजनिवास पान मसाला, गोवा गुटखा, विमल पान मसाला, राजनिवास सुगंधित पान मसाला रु, जाफराणी जर्दा असा एकूण ३ लाख ८ हजार ३९२ रु. चा गुटखा व तंबाखू आणि एक पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी असा एकूण ११ लाख ८ हजार ३९२ रु.रु. चा मुद्देमाल जप्त केला...

पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सय्यद जावेद कराडकर यांच्या फिर्यादी वरून महादेव घुले याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु.र.नं. २६८/२०२६ भा. न्या.

▸▸ उर्वरित पान २ वर